# महाराष्ट्र शासन

क्र. व्हीपीएम २०१६/प्र.क्र.६०/पंरा-४
ग्रामविकास विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई -४०० ००१.
दिनांक : ०६ डिसेंबर, २०१७

दुरध्वनी क्रमांक ०२२- २२०१७१०६
E mail - sopr4.rdd-mh@nic.in

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय :- ग्रामपंचायत नमुना नं. ८ मध्ये सहकारी संस्थांकडील कर्ज प्रकरणासंदर्भातील बोजा नोंद करणेबाबत.

महोदय,

विषयांकित प्रकरणी आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व याअंतर्गत महाराष्ट्र ग्रामपंचायत कर व फी नियम, १९६० मधील तरतुदींनुसार, ग्रामपंचायतींच्या नमुना नं. ८ मधील मिळकतीवर कर्जाचा बोजा अगर इतर कोणताही बोजा नोंदविण्याबाबतची तरतूद नाही. ग्रामपंचायत नमुना नं. ८ हा अधिकार अभिलेख नसून, फक्त कर आकारणी नोंदवही असल्यामुळे त्यावर सहकारी संस्थांचे भार/कर्ज बोजा नोंदविता येणार नाहीत.

जिल्हा व तालुका स्तरावरील भुमी अभिलेख कार्यालयाकडून तयार करण्यात येणारे प्रॉपर्टी कार्ड हे गावातील घरांबाबतच्या मालकी हक्काबाबतचा अधिकार अभिलेख असतो. त्यामुळे सदरील प्रॉपर्टी कार्ड वर कर्ज बोजा संबंधीच्या नोंदी घेता येऊ शकतात.

आपला

०६/१२/१७

( संतोष कराड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.